## श्रद्धांजली

### सीताराम निकम



**वडाळा महादेव (वार्ताहर)–** श्रीरामपूर येथील रहिवासी व जिल्हा सहकारी बँकेचे सेवानिवृत्त ऑडिटर सीताराम विश्वनाथ निकम (वय ८६) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, बंधू, दोन मुली, नातवंडे, जावई असा परिवार आहे. ज्येष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष लक्ष्मणराव निकम यांचे ते बंधू तर येथील गायत्री शिरसाळे व अश्विनी शिरसाळे यांचे वडील, पियुष व श्रीयांश शिरसाळे यांचे आजोबा होत.

### मिराबाई पवार



**नेवासा (तालुका वार्ताहर)–** येथील मिराबाई मारुती पवार (वय ४९) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, दोन मुली असा परिवार आहे. समर्पण फाऊंडेशनचे सागर पवार यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या पूर्व संकल्पानुसार कुटुंबियांनी त्यांचे मरणोत्तर नेत्रदान केले.

### यमुनाबाई मुंडलिक



**पाचेगाव फाटा (वार्ताहर)–** नेवासा तालुक्यातील बेलपिंपळगाव येथील यमुनाबाई बबनराव मुंडलिक (वय ७५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. दत्तप्रसाद व कृष्णा मुंडलिक यांच्या त्या मातोश्री तर राष्ट्रीय श्रीराम संघाचे गजानन मुंडलिक यांच्या आजी होत.

### विजया माळवे



**सोनई (वार्ताहर)–** येथील शिवाजी चौक परिसरातील रहिवासी विजया भास्कर माळवे (वय ७५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, तीन मुली व नातवंडे असा परिवार आहे. प्रतिमा व्यावसायिक भास्कर माळवे यांच्या त्या पत्नी तर उद्योजक मच्छिंद्रनाथ माळवे यांच्या मातोश्री होत.

### सुधाकर जायभाय



**लोहगाव (वार्ताहर)–** राहाता तालुक्यातील प्रवरानगर येथील सुधाकर पांडुरंग जायभाय (वय ६८) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक भाऊ, एक बहीण असा परिवार आहे. संतोष व संपत जायभाय यांचे ते वडील तर परमेश्वर जायभाय व आशाबाई जायभाय यांचे ते बंधू होत.

### बाजीराव राऊत



**वडाळा महादेव (वार्ताहर)–** श्रीरामपूर तालुक्यातील निपाणी वाडगाव येथील तंटामुक्ती अध्यक्ष बाजीराव भाऊराव राऊत (वय ७२) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, बंधू, बहिणी, पुतणे, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. येथील सामाजिक कार्यकर्ते आप्पासाहेब व शिवाजी राऊत यांचे ते वडील तर शेतकरी सेना तालुका अध्यक्ष विठ्ठल सोनवणे यांचे मामा होत.

### इंदूबाई खोसे



**नेवासा (शहर प्रतिनिधी)–** शहरातील इंदुबाई मोहन खोसे (वय ५४) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी, दीर, पुतणे, सुना, नातवंडे असा परिवार आहे. सचिन व सुनील यांच्या त्या मातोश्री, मोहन खोसे यांच्या पत्नी तर भिकाजी खोसे यांच्या भावजयी होत.

### लक्ष्मण चोपडे



**मांजरी (वार्ताहर)–** राहुरी तालुक्यातील मांजरी येथील तंटामुक्ती समितीचे माजी अध्यक्ष लक्ष्मण भिमाजी चोपडे (वय ७१) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सहा मुली, पाच भाऊ, एक बहीण, नातवंडे असा परिवार आहे. ते सेवानिवृत्त कृषी सहाय्यक तसेच येथील चंद्रगिरी देवस्थान ट्रस्टचे सचिव होते. प्राचार्य डॉ. भानुदास चोपडे यांचे ते बंधू होत.

# आदिवासींच्या घरांचा बेकायदा ताबा घेणाऱ्या फायनान्स कंपन्यांवर कारवाई करा- अहिरे

**हनुमंतगाव (वार्ताहर)–** आदिवासींच्या घरांचा बेकायदेशीर ताबा घेऊन आदिवासींना बेघर करणाऱ्या फायनान्स कंपन्यांवर कायदेशीर कारवाई करून या सर्व कंपन्यांची मान्यता रद्द करण्यात यावी, अन्यथा जिल्हाधिकारी कार्यासमोर बेमुदत उपोषण सुरू करण्यात येईल, असा इशारा एकलव्य भिल्ल सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष ज्ञानेश्वर अहिरे यांनी दिला आहे.

जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात श्री. अहिरे यांनी म्हटले आहे, जिल्ह्यामध्ये काही फायनान्स कंपन्यांनी एक रॅकेट तयार केले आहे. या कंपन्या आदिवासींना त्यांच्या मालमत्तेवर काही तुटपुंजी रक्कम कर्ज स्वरूपात देतात. त्यामध्ये आदिवासींच्या घरांवर देखील काही विशिष्ट व्याजदराने कर्ज दिले जाते. त्यानंतर या आदिवासींकडून काही कागदावर सह्या घेतल्या जातात. त्यामध्ये असे अनेक मुद्दे असतात की, ते डोळ्याने दिसू शकत नाही इतक्या बारीक अक्षरात असतात. तसेच या कंपन्याचे अधिकारी काही कोऱ्या कागदावर देखील सह्या घेतात. त्यानंतर अव्वाच्या सव्वा व्याजदर लावून आदिवासींना हैराण केले जाते. एक-दोन हप्ते थकल्यास त्वरित आदिवासींच्या घराचा ताबा घेण्यात येतो. ही सर्व प्रक्रिया अगोदरच या फायनान्स कंपनीने केलेली असते. यामध्ये केवळ आदिवासींना बेघर करण्याचा उद्देश या कंपन्यांचा आहे. आदिवासींच्या घरांची खरेदी किंवा विक्री होत नसतानाही या फायनान्स कंपन्या काही शासकीय अधिकाऱ्यांना हाताशी धरून सोयीस्करपणे आदिवासींच्या घरांची विल्हेवाट लावत आहेत.

श्रीरामपूर तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात या फायनान्स कंपनीने धुमाकूळ घातला आहे. तेव्हा या कंपन्यांची चौकशी होणे गरजेचे आहे. आदिवासींच्या घराचा ताबा घेण्यासाठी जोरजबरीने दमबाजी करून ताबा घेण्यात आला आहे. या सर्व फायनान्स कंपन्यांची चौकशी करून या कंपनीने आतापर्यंत कोणाला कोणाला फसवले आहे तसेच आदिवासींना बेगर करण्यासाठी काही कारस्थान रचले जात आहे का? या कंपन्यांमार्फत काही धनदांडगे आदिवासींची मालमत्ता हडप करण्याचा प्रयत्न करत आहेत का? या सर्व विषयांची सखोल चौकशी करून या फायनान्स कंपन्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी आणि या कंपन्यांची मान्यता रद्द करून आदिवासींना त्यांच्या घरांचा पुन्हा ताबा देण्यात यावा; अन्यथा जिल्ह्यातील सर्व अन्यायग्रस्त आदिवासींना घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू करण्यात येईल, असा इशारा ज्ञानेश्वर अहिरे यांनी दिला आहे.

### स्वातंत्र्याच्या ७८ वर्षानंतर आमदार काळे यांच्या प्रयत्नातून

# कुंभारी-शिर्डी रस्त्याचे काम मार्गी



**कुंभारी (वार्ताहर)–** कोपरगाव तालुक्यातील ग्रामीण भागातील रस्त्यांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आ. आशुतोष काळे यांच्या पाठपुराव्यानंतर अनेक रस्त्याचे कामे मार्गी लागली आहेत. स्वातंत्र्याच्या ७८ वर्षानंतर कुंभारी ते शिर्डी या ८ किलोमीटर रस्त्याचे काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत जवळपास दीड कोटी रुपये खर्च करून रस्त्याचे खडीकरण, मजबुतीकरण व डांबरीकरण मार्गी लागल्यामुळे या रस्त्याचा वापर करणाऱ्या कुंभारी, देर्डे, कोपरगाव, हिंगणी, मढी आणि शिर्डी या रस्त्यावरून जाणाऱ्या सहा गावातील लोकांना मोठ्या प्रमाणावर फायदा झाला आहे.

ग्रामीण भागातील रस्ते हे विकासाच्या धमण्या असल्यामुळे या रस्त्याचे डांबरीकरणाच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांचा अनुशेष भरून काढण्यासाठी आ. आशुतोष काळे यांनी वेळोवेळी पाठपुरावा केला आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील रस्ते शेतकरी बांधवांना वरदान ठरत आहेत आणि या रस्त्याने प्रवास करणे सुलभ झाले आहे. कुंभारी ते देर्डे हा रस्ता गेल्या ७५ वर्षापासून विकासापासून वंचित होता. ग्रामीण भागातील लोकांनी या रस्त्याचे काम मार्गी लावण्यासाठी वेळोवेळी पाठपुरावा केला होता. त्या मागणीची दखल घेऊन शासन स्तरावर पाठपुरावा करून हा रस्ता काही दिवसांपूर्वीच डांबरीकरण झाला आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शेती उत्पादने तालुक्याच्या ठिकाणी नेताना मोठी सुविधा प्राप्त झाली आहे. त्याबरोबरच या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना देखील प्रवास सुखकर झाल्यामुळे या रस्त्यावर अवलंबून असलेल्या जवळपास ६ गावांतील लोकांचा रस्त्याबाबतचा प्रश्न या डांबरीकरणामुळे मार्गी लागलेला आहे. त्याबरोबरच कुंभारी ते काळे वस्ती मढी या पाच किलोमीटर रस्त्याचे काम देखील सुरू झाल्यामुळे या परिसरातील ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण पसरले आहे.

# राज्य शासनाने हिंदी भाषा सक्तीची करु नये- शिंदे



**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** राज्य सरकारने इयत्ता पहिलीपासून तीन भाषा शिकविण्याचा निर्णय घेतला, या निर्णयाविरोधात राज्यभर संतप्त प्रतिक्रीया उमटत आहेत. हिंदी भाषा सक्तीची असल्याच्या आरोपाने वाद पेटला आहे. मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी याविरोधात पत्रक काढून शाळांच्या मुख्याध्यापकांना उद्देशून इशारा दिला आहे. या पत्रकाच्या पार्श्वभूमीवर श्रीरामपूर तालुका व शहर मनसेच्यावतीने स्थानिक शिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

मनसेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब शिंदे यांनी दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे की, इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांवर तीन भाषा शिकवण्याचा ताण टाकणे, हे शैक्षणिक दृष्टिकोनातून अयोग्य आहे. शिवाय मराठी आणि इंग्रजी या दोन भाषा पुरेशा असून, राज्यभाषा म्हणून मराठीचे स्थान अबाधित ठेवणे हीच प्रत्येक शाळेची प्राथमिक जबाबदारी आहे. मुलांवर लहान वयात ओझ टाकून सरकार नेमक कोणत राजकारण करतय हे समजायला तयार नाही, त्यामुळे शासनाने शालेय अभ्यासक्रमात हिंदी भाषा सक्तीची करु नये, असे त्यांनी निवेदनात म्हंटले आहे.

या निवेदनावर मनसे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब शिंदे, जिल्हा सचिव डॉ. संजय नवथर, सतीश कुदळे, अमोल साबणे, स्वप्निल सोनार, विलास पाटणी, भास्कर सरोदे, निलेश सोनवणे, सुजित गायकवाड, सचिन कदम, संकेत शेलार, अतुल खरात, कुणाल सूर्यवंशी, नितीन जाधव, संदीप विश्वंभर, संदीप पिंटो, लखन कुरे, डॉ. प्रसाद पऱ्हे, चेतन दिवटे, विनोद शिरसाठ, राहुल शिंदे यांच्यासह अनेकांच्या सह्या आहेत.

# गुणवत्ता उंचावण्यासाठी शिक्षकांनी योगदान द्यावे- गुंड



**संगमनेर (वार्ताहर)–** विद्यार्थ्यांच्या विकासासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करत गुणवत्ता उंचावण्यासाठी शिक्षकांनी योगदान द्यावे. राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अंतर्गत नव्याने बदल केले जात आहेत. त्या बदलांचा वेध घेऊन वर्ग स्तरावर देखील अध्ययन, अध्यापन, मूल्यमापनात बदल करा, असे प्रतिपादन संगमनेर पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी बाळासाहेब गुंड यांनी केले.

संगमनेर तालुक्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापकांच्या आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी शिक्षण विस्तार अधिकारी कल्याण राऊत, नंदा वलवे, मंगला कलगुंडे, श्रीमती. ठोकळ, दत्ता मैड, शिवाजी सोनवणे, रवींद्र अनाप, बाळासाहेब जाधव, बाळू जाधव, आशा घुले, पार्वती गाडेकर, विनायक भोसले यांसह केंद्रप्रमुख उपस्थित होते.

आपल्या भाषणात गुंड म्हणाले, शालेय परिसरामध्ये वनराई फुलवण्याची आवश्यकता आहे.शालेय पोषण आहाराला उपयोगी पडतील अशाप्रकारच्या रोपांची लागवड करा. जिल्ह्यात सुरू असणाऱ्या मिशन आरंभ कार्यक्रमामध्ये शिक्षकांनी योगदान द्या. शासनाने निर्धारित केलेली सर्व प्रकारची परिपत्रके व्यवस्थितपणाने अंमलबजावणीसाठी कार्यालयात ठेवा. गुणवत्ता सुधारण्यासाठी शिक्षक व मुख्याध्यापक यांनी योगदान द्या. तसेच शासकीय योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करा. शिष्यवृत्तीचे निकाल अधिक उत्तम लागतील यासाठी नियोजन करा. आपुलकी कार्यक्रमांतर्गत लोकांचा सहभाग अधिक चांगला मिळत आहेत, तो अधिक उंचावण्यासाठी प्रयत्न करा. त्यासोबत त्याचा हिशोब देखील स्वतंत्रपणे कार्यालयात ठेवण्याचे आवाहन त्यांनी केले. प्रास्ताविक बाळासाहेब जाधव यांनी केले. सूत्रसंचालन केंद्रप्रमुख सुभाष रहाणे यांनी केले तर आभार प्रदर्शन नंदकुमार राणे यांनी केले.

# पुणतांबा परिसरात आता रानडुकरांमुळे शेतकरी त्रस्त

**पुणतांबा (वार्ताहर)–** परिसरात आता हरणांचे कळप, बिबट्यांसोबतच रानडुकरांचा वावर वाढल्यामुळे परिसरातील शेतकरी व ग्रामस्थ भयभीत झाले आहेत.

शेती महामंडळाच्या चांगदेवनगर मळ्यावर पाटपाण्याच्या कमतरतेमुळे महामंडळाने २००७-२००८ पासून महामंडळाच्या मालकीच्या जमीनीची मशागत करणे थांबवले होते. या निर्णयामुळे परिसरात वेड्या बांभळीची जंगले वाढली होती. परिणामी, हरणांच्या कळपांची संख्या वाढली होती. त्यामुळे डेरानाला वाकडी रोड, धुमाळ माथा, मातुलठाण रोड, पुरणगाव रोडसह काही भागात हरणांची संख्या वाढली होती. ज्यामुळे परिसरातील पिकांचे नुकसान होण्याचे प्रमाण वाढले. महामंडळाच्या चांगदेवनगर मळ्याने ७० टक्के जमीन संयुक्त शेतीसाठी कराराने दिल्यामुळे हे क्षेत्र वहिवाटीसाठी येऊन त्यात पिके घेण्यास सुरुवात झाली. त्याचा परिणाम म्हणून हरणांना निवाऱ्यासाठी जंगल नसल्यामुळे अनेक कळपांनी इतरत्र स्थलांतर केले आहे. असे असले तरी अजूनही परिसरात हरणांचे कळप आहेत, सध्या अपुरा पाऊस तसेच भक्ष्य शोधण्यासाठी ही कळपे रानोमाळ फिरत असून पिकांचे नुकसान करत आहेत. मध्यंतरी परिसरात बिबट्यांचा वावर वाढला होता, पण आता मात्र गेल्या काही दिवसांपासून परिसरात रानडुकरांचे प्रमाण वाढले आहे. ही रान डुकरे आहेत की गावातील डुकरे याचा अंदाजही शेतकरी वर्गाला लागत नाही. तीन दिवसांपूर्वी येथील डेरानाला भागात चरांमध्ये दिवसा ३ ते ४ रानडुकरे शेतकऱ्यांना दिसून आली. येथील उसाच्या लागवडीतही ती फिरतांना आढळून आली. त्यामुळे शेतकरी वर्ग भांबावलेला आहे. सामाजिक वनीकरण विभागाने डुकरांचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी मनसेचे शेतकरी सेनेचे तालुकाध्यक्ष संदीप वहाडणे यांनी केली आहे.

# विषारी औषध सेवनाने मृत्यू

**सिन्नर–** विषारी औषध सेवन केल्याने सोमठाणे येथील उत्तम लहू जाधव (४०) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

जाधव यांनी मनोहर रामचंद्र वाघ यांच्या मळ्यात विषारी औषध सेवने केल्याने त्यांना दोडी ग्रामीण रुग्णालय व तेथून नाशिक जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी वावी पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

# घरासमोरुन दुचाकी चोरी

**सिन्नर–** लोणारवाडी येथून घरासमोर लावलेली प्लॅटिना दुचाकी क्र. एम.एच. १५/ जे. ई. ६७३८ अज्ञात चोरट्याने रात्रीतून चोरी केली. चोरीला गेल्याने पांडुरंग भास्कर बलक (४२) यांनी सिन्नर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.